### खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

### राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ - शिष्यवृत्ती वाटप

**पुण्य नगरी**

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाला सहकार्य करणार : आ. काळे

**। राजगुरूनगर : प्रतिनिधी**

खेड तालुक्याच्या शैक्षणिक जडणघडणीत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे योगदान अत्यंत मोलाचे असून संस्थेच्या सर्व अडीअडचणी समजून घेऊन त्यांना सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी केले. पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून शिष्यवृत्ती वाटप आणि के. टी. एस. पी. मंडळ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट अँड रिसर्च अंतर्गत पॉलिटेक्निक आणि एमबीए महाविद्यालयाच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.



यावेळी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, सुशिल शिंगवी, हिरामण सातकर, सतीश नाईकरे, बाळासाहेब लिंभोरे, प्रमोद गाणू, राजेंद्र टाकळकर, बळवंत डांगले, विजय वाडेकर, ॲड. राजमाला बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, एमबीए डायरेक्टर डॉ. एच. एम. जरे, प्राचार्य डॉ. अमोल ए. कोल्हे आदी उपस्थित होते. आ. काळे म्हणाले, या शैक्षणिक संस्थेमधून अनेक नामवंत विद्यार्थी घडले आहेत, यापुढे देखील शिक्षणाची गुणवत्ता दर्जा आणि ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता लागेल त्याच्या गोष्टींची पूर्तता करण्यासाठी या तालुक्याचा लोकप्रतिनिधी या नात्याने सर्व मदत करणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले तर आभार डॉ. एच.एम.जरे यांनी मानले.

Pimpri Chinchwad Edition
Aug 14, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

लोकमत

शुभेच्छा दिल्या.

# खेड तालुका शिक्षणप्रसारक मंडळाला सर्वतोपरी सहकार्य करणार : काळे

## पॉलिटेक्निक आणि एमबीए महाविद्यालयाचा शुभारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** खेड तालुका शैक्षणिक विकासात खेड तालुका शिक्षणप्रसारक मंडळाचे योगदान अत्यंत मौल्यवान आहे. संस्थेच्या सर्व अडचणी समजून घेऊन त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी केले.

ते पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून शिष्यवृत्ती वाटप आणि के.टी.एस.पी. मंडळाच्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट अँड रिसर्चअंतर्गत पॉलिटेक्निक व एमबीए महाविद्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

यावेळी संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, सतीश नाईकरे, बाळासाहेब लिंभोरे, प्रमोद गाणू, राजेंद्र टाकळकर, बळवंत डांगले, विजय वाडेकर, अॅड. राजमाला बुट्टे-पाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, एमबीए डायरेक्टर डॉ. एच. एम. जरे, प्राचार्य डॉ. अमोल ए. कोल्हे आदी उपस्थित होते.

संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी सांगितले की, संस्था तालुक्यातील विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख आणि रोजगारक्षम शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहे. त्यांनी खेड तालुक्याच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीकरणासाठी आर्थिक मदत केल्याबद्दल खासदार शरद पवार यांचे आभार मानले.

**५०** लाख रुपयांची रक्कम बँक खात्यात ठेवली आहे.

पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे खेड तालुका शिक्षणप्रसारक मंडळाच्या माध्यमातून ५० लाख रुपयांची रक्कम बँक खात्यात ठेवली आहे.

या ठेवीच्या व्याजातून सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टे-पाटील आणि दत्तात्रय वळसे-पाटील यांच्या नावाने हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे-पाटील महाविद्यालयातील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती वाटप केली जाते.



पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टअंतर्गत शिष्यवृत्ती वाटप करताना आमदार बाबाजी काळे.

### ५ लाख ८१ हजारांहून अधिक शिष्यवृत्तींचे वाटप

१. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ मधील १७५ विद्यार्थ्यांना ५ लाख ८१ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

२. आमदार बाबाजी काळे यांनी पुढे बोलताना सांगितले की, या शैक्षणिक संस्थेमधून अनेक नामवंत विद्यार्थी घडले आहेत.

३. भविष्यातही शिक्षणाची गुणवत्ता, दर्जा आणि आवश्यक सुविधा यासाठी त्यांनी या तालुक्याचा लोकप्रतिनिधी म्हणून संपूर्ण मदत करण्याचे आश्वासन दिले.

४. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. एच. एम. जरे यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Aug 14, 2025
Powered by: erelego.com

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे योगदान महत्त्वपूर्ण : आ. काळे

**राजगुरूनगर :** खेड तालुक्याच्या शैक्षणिक जडणघडणीत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. संस्थेच्या सर्व अडीअडचणी समजून घेऊन त्यांना सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे आश्वासन आमदार बाबाजी काळे यांनी दिले. ते पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून शिष्यवृत्ती वाटप आणि के. टी. एस. पी. मंडळ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट अँड रिसर्च अंतर्गत पॉलिटेक्निक आणि एमबीए महाविद्यालयाच्या शुभारंभाप्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, सतीश नाईकरे, बाळासाहेब लिंभोरे, प्रमोद गानू, राजेंद्र टाकळकर, बळवंत डांगले, विजय वाडेकर, अ‍ॅड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. अमोल ए. कोल्हे आदी उपस्थित होते.



**राजगुरूनगर :** एमबीए महाविद्यालयाच्या शुभारंभप्रसंगी आमदार बाबाजी काळे व इतर मान्यवर उपस्थित होते.

## गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप

पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून बँक खात्यात ५० लाख रुपये ठेव करण्यात आली आहे. या ठेवीच्या मिळणाऱ्या व्याजातून सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार, साहेबराव बुट्टे पाटील आणि दत्तात्रय वळसे-पाटील यांच्या नावाने संस्थेच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयातील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती वाटप करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २३-२४ व २४-२५ मधील १७५ विद्यार्थ्यांना ५ लाख ८१ हजारांहून अधिक रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

बाबाजी काळे म्हणाले की, या शैक्षणिक संस्थेमधून अनेक नामवंत विद्यार्थी घडले आहेत. यापुढे देखील शिक्षणाची गुणवत्ता, दर्जा आणि ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता लागेल त्याच्या गोष्टींची पूर्तता करण्यासाठी या तालुक्याचा लोकप्रतिनिधी या नात्याने सर्व मदत करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी तालुक्यातील विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख आणि रोजगारासाठी आवश्यक शिक्षण देण्यासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे सांगितले. तालुक्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी आर्थिक मदत केल्याबद्दल शरद पवार यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

**डॉ. संजय शिंदे**

**प्रसिद्धी विभाग प्रमुख**